निर्माते नाटकांची प्रसिध्दीही फार खुबीने करतात. प्रेक्षकांना आकृष्ट करुन घेतात. वृत्त पत्रात अभिनेत्यांचे फोटो देऊन मोठमोठी जाहिरात करणे हा त्यांच्या व्यवसायाचा भाग आहे. प्रश्न पडतो एवढया मोठ मोठया जाहिराती देऊन प्रयोगाच्या जामखर्चाची तोंडमिळविणी कसे करत असतील ? जाहिरातीमध्ये मोठमोठया कलाकरांची प्रयोग आवडल्याची, समिक्षकांना प्रयोग आवडण्याची ओळ टाकूल प्रेक्षकांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न ही करतात. पण प्रेक्षकांनी असे दुस-याच्या मनाने जाणे याचा अर्थ प्रेक्षकांचा स्वत:च्या अभिरुचीवर विश्वास नाही असा होते. पूर्वी प्रेक्षक संस्थेचे नाव पाहून नाटक बघायला यायचा.आज सिलिब्रिटी कलाकारांची नावे पाहून येतो. अजून एक प्रेक्षकांची मानसिकता म्हणजे सर्व समिक्षकांनी स्तुतीसुमने वाहिलेल्या नाटकाच्या प्रयोगाला विचार न करता येतो व समीक्षकाने थोडेसे अप्रिय लिहिले की प्रक्षेक त्या नाटकाचा विचारही करत नाही. तोंडातोंडी झालेली प्रसिध्दि प्रेक्षक मान्य करतो व प्रयोग पाहतो.

**नाटककार :-**

प्रयोगकलेच्या प्रवासात पहिला घटक म्हणजे नाटककार व त्यांनी लिहिलेली संहिता. संहिता ते प्रयोग हा सृजन प्रवास म्हणजे आत्मशोध. या आत्मशोधातील सर्व घटाकांची आजची स्थिती पहायला हवी. आज रंगभूमीवर पंन्नासहून अधिक नाटकांचे प्रयोग चालू आहेत. डॉ. राजीव नाईक यांनी नाटकांचे प्रकार सांगितले आहेत-. सततची, आत्ताची आणि या दोहोंच्या आधली मधली आज रंगभूमीवर आताचीच नाटके अधिकांशाने दिसतात. आताच्या समस्या मांडणारी नातेसंबंधा विषयीची असे ढोबळ मनाने म्हणता येऊ शकते. सततची नाटकेही सादर होताहेत. त्यांची पुनर्निर्मिती होते आहे.

वि.वि शिरवाडकारांपासून ते शफाअत खान पर्यंतच्या नाटककारांनी मराठी रंगभूमीला समृध्द केले. आजचा एक नाटककार डॉ. विवेक बेळे ३.४ वर्षांनी एक सकस नाटक लिहितो. तो बहुप्रसवा नाही. तसेच सुरेश चिखले, संतोष पवार, संजय पवार, चिन्मय मांडलेकर, रत्नाकर मतकरी, सतीश आळेकर, प्रशांत दळवी, राजीव नाईक, शफाअत खान सारखे नाटककार अजून लिहितच आहेत.

स्त्री नाटककारांमध्ये इरावती कर्णिक, मनस्विनी लता रविंद्र व सुषमा देशपांडे यांचा उल्लेख जरूर करायला हवा. डॉ. आनंद नाडकर्णी मानसशास्त्रज्ञ आहेत त्यांचीही मानसशास्त्रीय नाटके प्रयोगात आहेत. शिवाय धर्मकीर्ती सुमंत हा तरुण नाटककार नव्या सामाजिक विषयाला भिडतो आहे.

आजचे तरुण नाटककार जस जसे अनुभवाने समृध्द होत जातील तसतसे त्यांच्या नाटयकृतीत सकसपणा व विविधता येइल अशी आशा आहे. उद्याचे नाटककार फक्त शहरी विभागातून येणारे असतील असे नाही ते ग्रामीण भागातूनही येऊ शकतात. उदाहरण अगदी ताजे आहे, शिवाजी अंडरग्राऊंडचे.

ग्रामीण भागातील तरुणांना नाटयलेखनासाठी प्रवृत्त करावे लागेल. मार्गदर्शनही करावे लागेल. त्यासाठी आमचा प्रयत्न चालू आहे. अशा तरुणांचा शोध घेऊन नाटयलेखन कार्यशाळा आम्ही घेणार आहोतच. आशा आहे की अशा प्रयत्नातून हा महत्वाचा घटक भावी रंगभूमीला मिळणार आहे.

**दिग्दर्शक:-**

या प्रयोगकलेचा सुकाणू म्हणजे दिग्दर्शक, दिग्दर्शकाला प्रयोगकलेचा अनुभव असायला हवा. अभ्यास केलेला असावा. आत्मविश्वास असायला हवा. दिग्दर्शकाला नटाकडून चांगला अभिनय करुन घ्यायची हातोटी असावी लागते. काही भडकणारे दिग्दर्शक पाहतो, काही समजावून देणारे दिग्दशर्क पाहतो. आज मराठीत पूर्णवेळ दिग्दर्शनाचे काम करणारे विजय केंकरे आणि मंगेश कदम यांच्यासारखे दिग्दर्शक आहेत. त्यांचे हे उपजीविकेचे एकमेव साधन आहे. निर्मात्याबरोबर झालेल्या करारातून जेवढी आर्थिक प्राप्ती असेल. तेवढयातच ते गुजराण करतात. रंगभूमीची नाळ तोडायची नाही असे त्यांना ठाम ठरविले आहे. या